॥ या विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Phone : (02462) 215525 DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 215572
E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र./ वि.वि.वि./ २०२५ -२६/ ३८

दिनांकः - ०४/०९/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये,
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले विद्यापीठ परिसर
मा. संचालक विद्यापीठ उप परिसर पेठ, लातूर व परभणी
मा. प्राचार्य, न्यू मॉडल डिग्री कॉलेज, हिंगोली
मा. समन्वयक कै.उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट

विषय: विद्यापीठस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत सहभाग घेणे बाबत .

महोदय,

आपणास कळविण्यात येते की, हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित दि. ११ सप्टेंबर, २०२५ ते १९ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने विद्यापीठस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेचे आयोजन दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रस्तुत विद्यापीठाच्या मा अधिसभा सभागृहामध्ये (सिनेट हॉल ) सकाळी ठीक १०:०० वाजता आयोजन करण्यात आले आहे . विद्यापीठ स्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या संघास अनुक्रमे अकरा हजार, सात हजार व पाच हजार असे रोख बक्षीस व प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह दिले जाईल.

दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यापीठ स्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेसाठी आपला संघ घेऊन, विद्यापीठामध्ये नियोजित वेळेवर उपस्थित राहण्यासाठी आपल्या स्तरावरून कळवून सहकार्य करावे, संघासाठी लागणार प्रवास खर्च व दैनिक भत्ता व इतर खर्च महाविद्यालय स्तरावर करण्यात यावा व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थीच्या यादीसह प्राचार्यांचे पत्र, विद्यार्थ्यांचे ओळख पत्र , वयाचा दाखला ( वय २५ वर्षाच्या आत असावा ) तसेच समूहगीत सादरीकरणाचा वेळ ५ ते ८ मिनिटे असावा त्यामध्ये लोकगीत सादर करू नये.' ज्ञानतीर्थ' युवक महोत्सवाच्या भारतीय समूहगीत स्पर्धेच्या नियमांचे पालन करावे, ही विनंती.

सोबत गुगल लिंक द्वारे नोंदणी करावी: https://docs.google.com/forms/d/e/1FAIpQLSefyM0dE0RKddb-kipMtf9wAny_AOeWRHikwCiyUZBV6bu8aw/viewform

प्रा. डॉ . शिवराज शिंदे
स्पर्धा समन्वयक मो ९०११९४५९९६

डॉ. सुहास पाठक
प्र-संचालक
विद्यार्थी विकास विभाग

प्रत माहितीस्तव :

सिस्टीम एक्सपर्ट , ( संगणक विभाग ) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding **विद्यापीठस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत सहभाग घेणे बाबत** या शीर्षकाखाली विद्यापिठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे.